मंगळवार दि.३० एप्रिल २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २४६
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६


जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
दैनिक लोकनेता बीड
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# स्वामी चिंचोली येथील कोविड सेंटर मधील बेड चोरी करण्यासाठी चानाक्ष मेंदू कोणाचा

## दौंड आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर फिर्याद देण्यास टाळाटाळ का?


लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**

स्वामी चिंचोली ता. दौंड येथील कोविड सेंटरधील ७१ बेड व ईतर साहित्य चोरीला गेले असून तालुका आरोग्य अधिकारी आणि ईतर कर्मचारी यांनी समक्ष चौकशी करून २ महिने उलटले असून काहीच कारवाई केली नसल्याने
आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला असून कार्यालयात बसून फक्त कागदी घोडे नाचवणाऱ्या दौंड पंचायत समितीच्या आरोग्य खात्याची बेपरवाई समोर आली आहे.
करोना काळामध्ये स्वामी चिंचोली.ता दौंड येथे मल्लिकनाथ आश्रम या ठिकाणी करोना सेंटर चालू होते.करोनाचा प्रभाव कमी झाल्याने.आरोग्य खात्याकडून या सेंटर कडे दुर्लक्ष करण्यात आले.या सेंटर मधील पेशंटचे बेड चोरी झालेले दोन वर्ष उलटले असून त्यासंबंधी समक्ष पाहणी करून देखील काहीच पुढील कारवाई तालुका आरोग्य अधिकारी,गटविकास अधिकारी, आणि तहसीलदार यांनी केलेली नाही.
यामुळे या संबंधित कर्मचाऱ्यांना वाचवण्यासाठी तसेच बरेच औषधे,ऑक्सीजन सिलेंडर व त्याच्या निगडीत असलेले सर्व साहित्य धुळखात पडलेले अवस्थेत,आणि मुदतबाह्य झालेली आजही या सेंटरमध्ये पाहवायस मिळालेआहे.करोना काळात लागणारे साहित्य.तसेच पेशंटच्या बेडची चोरी झाल्याची फिर्याद पोलीस स्टेशनमध्ये का दाखल केली नाही. त्यामुळे आजपर्यंत काय उपाययोजना केली,तालुका आरोग्य विभागाचे किती प्रशासकीय नियंत्रण आहे.असा सवाल उपस्थित झाला आहे.आणि याचीच नागरिकांमध्ये जोरात चर्चा सुरु आहे. तालुक्यातील मुग गिळून बसलेले वरिष्ठ अधिकारी यांना माहिती विचारली असता महिती देली नाही.उलट माहीती देण्यास टाळाटाळ करत आहेत.आणि वेळकाढू पणा करत आहेत.तसेच वरीष्ठ कार्यालयाकडून वेळीच हालचाल केली असती तर ऐवढी परिस्थिती गंभीर झाली नसती.आणि जनतेसाठी आलेले औषधे खराब झाली नसती.जनतेसाठी आलेल्या लाखो रुपयांच्या औषधांचे नुकसान वाचले असते.कोविड सेंटरमधील बेड चोरी झाले नसते.म्हणून संबधित कालावधीत कर्तव्यात कसूर करणाऱ्या आणि शासकीय मालमत्तेची चोरी होण्यास कारणीभूत असलेल्या,हलगर्जीपणा करणाऱ्या बेजबाबदार आरोग्य कर्मचारी आणि अधिकारी यांचेवरती काय कारवाई होणार याकडे संपूर्ण दौंड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# परळी शहरात मतदार जन जागृती करिता सायकल रॅली

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**



बीड लोकसभा अंतर्गत २३३ परळी विधानसभा मतदारसंघांत दिनांक १३ मे २०२४ रोजी होणारे मतदानकरिता मतदार जनजागृतीसाठी नवीन शासकीय विश्रामग्रह परळी वै येथुन सायकल रॅलीस सुरवात करुन रॅली पुढे शिवाजी महाराज चौक , मोंढा मार्केट, टॉवर , पोलीस स्टेशन , नगर पालीका अशी काढण्यात आली .नगर पालीका कार्यालयात सहभागी सायकल स्वार ,विद्यार्थी व कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला . रॅलीत सहभागी नागरिक व कर्मचारी , विद्यार्थी यांना मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी श्री अरविंद लाटकर साहेब यांनी प्रत्येक घटकातील मतदारांना जागृत करून येणाऱ्या १३ मे रोजी मतदानामध्ये सहभागी करून घेण्याचे आवाहन केले यासाठी सर्व अधिकारी कर्मचारी विविध सामाजिक संस्था नागरिक यांनी मतदार जनजागृती चे काम करावे असेही आव्हान त्यांनी याप्रसंगी केले . याप्रसंगी श्री वेंकटेश मुंडे तहसीलदार परळी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की लोकांनी स्वतःच्या आरोग्यासाठी स्वतः नियमित सायकल चालवणे गरजेचे आहे व लोकशाहीला बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदान करण्याची आवश्यकता आहे .
=९याप्रसंगी मा.श्री अरविंद लाटकर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी परळी , श्री व्यंकटेश मुंडे तहसिलदार परळी , श्री त्र्यंबक कांबळे मुख्याधिकारी नगरपालिका परळी ,शिवाजी मुंडे सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत समिती परळी, बाबुराव रुपनर नायब तहसिलदार , श्रीराम कनाके गटशिक्षण अधिकारी, पोलीस विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी ,डॉक्टर बालासाहेब कराड, डॉक्टर अजय केंद्रे ,संजय कराड सर,अजय जोशी सर,सर्व महसूल विभागाचे तलाठी ,मंडळ अधिकारी व नगरपालिकेचे अधिकारी ,कर्मचारी , पंचायत समिती व शिक्षण विभागाचे शिक्षक विद्यार्थी कर्मचारी , अनेक डॉक्टर्स , विविध शाळेचे व ॲकॅडमीचे विद्यार्थी रमेश चव्हाण सर्व त्यांचे विद्यार्थी, मिलिया शाळेचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.या रॅलीचे चे नियोजन सूत्रसंचालन व आभार श्री शाम अघाव यांनी केले. सायकल रॅली यशस्वी करण्यासाठी नायब तहसीलदार बाबुराव रुपनर , निवडणुक मतदार जनजाग्रती ड्डाशशि विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी श्री गोविंद कराड सर ,श्री शाम आघाव, गंगाधर केलूरकर सर ,सुरेखा थोरवे ,चौधरी मॅडम रमा दासूद मॅडम ,रेखा कोळपकर मॅडम, मंगल मुंडे मॅडम ,विष्णु गीते , स्वामी सर यांनी परिश्रम घेतले .

# आष्टी तालुक्यातील सोलापूरवाडी येथे खंडोबा आणि भैरवनाथ यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | राजू म्हस्के**



तालुक्यातील सोलापूर वाडी येथील खंडोबा भैरवनाथाची यात्रा मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाली असून या यात्रेमध्ये वृद्धापासून ते अगदी लहान मुलांपर्यंत सर्वांनीच मोठ्या उत्साह हाने सहभाग घेतला होता यात्रेच्या दिवशी दक्षिणेतील काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पैठणहून आणलेल्या कावडीचया पाण्याने जलाभिषेक भैरवनाथ आणि खंडोबा महाराजांना करण्यात आला या कावडीचे स्वागत ग्रामस्थांनी तसेच हलगीच्या पथकाने वाजत गाजत करण्यात आलं दिवसभर भक्तांचे रेल चेल चालूच होती यात्रेनिमित्त मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती प्रकाशने मंदिराचा परिसर प्रकाशने नाहून निघाल्यासारखा दिसत होता त्यामध्येच रात्रीच्या वेळी देवांच्या मानाच्या काठ्यांची निघालेली मिरवणूक सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं ढोल ताशा आणि संबळ्याच्या तालावर नऊ तरुणाई बेहोश होऊन धुंद होऊन नाचत होती त्यामध्ये फटाक्यांच्या आतिषबाजी नंतर आसमान विविध रंगाने फुलून गेल्यासारखे दिसत होतं रात्री ठीक साडेआठ वाजता भैरवनाथ आणि खंडोबा महाराजांच्या सामुदायिक महा आरती कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली यावेळी परिसरात परिसरातील पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी येळकोट येळकोट जय मल्हार आणि भैरवनाथाच्या नावाचं चांगभले करुन तळी उचलण्याचा कार्यक्रम झाला.

# उमरखेड येथे दहा दिवसीय विपश्यना शिबिर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यद रहीम रजा**

उमरखेड येथे दहा दिवसीय विपश्यना सुदत्त विपश्यना केंद्र उमरखेड तथा धम्ममल्ल विपश्यना केंद्र यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने विपश्यना विश्व विद्यापीठ इगतपुरी अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा झाडगाव (बाळदी) ता. उमरखेड जि. यवतमाळ येथे दिनांक ७ मे २०२४ते १८ मे २०२४ पर्यंत दहा दिवसीय विपश्यना शिबिराचे आयोजन केले आहे. शिबिरामध्ये सामील होण्यासाठी खालील आवेदन पत्र माहिती भरून व्हाट्सअप वर किंवा ईमेलवर दिनांऊ ३०/४/२०२४ पर्यंत पाठवा.

१)पुर्ण नाव :-
२) जन्मतारीख:-
३) शिक्षण-
४) मोबाईल नंबर-
५) आधार नंबर-
६) व्यवसाय-
७) आपत्कालीन मोबाईल नंबर
८) प्रथम शिबीर दिनांक-
९) स्थळ-
१०) शिबिर संख्या-
११) आचार्याचे नाव-

संपर्क:-
विजय कानंदे ९४०४८२७४६३
गजानन शिंगणकर
९७६७४४७२१२
सुरेश मुनेश्वर
९६६५६६७७८५
Email , vijaykaninde358ukdgmail.com
विपश्यना समिती उमरखेड

# दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाची वार्षिक आढावा बैठक संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा | ज्ञानेश्वर बुधवत**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालयाची वार्षिक आढावा बैठक आज रविवार दि. २८ एप्रिल २०२४ रोजी संपन्न झाली आहे.

शाळा,शिक्षक,विद्यार्थी यांचा संख्यात्मक विकासाबरोबरच गुणात्मक विकास व्हावा या उद्देशाने चालू शैक्षणिक वर्षातील विविध उपक्रम,जयंती, पुण्यतिथी,सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ,प्रशासन,व्यवस्थापन इत्यादी बाबीचा सचिव श्री.प्रेमराजसेठ भाला यांनी एकत्रितपणे आढावा घेऊन सविस्तरपणे मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणादरम्यान संचालक श्री.अशोकभाऊ कोटेचा यांनी शिक्षकांनी अधिक जबाबदारीने आपली कर्तव्ये पार पडवीत असे प्रतिपादन केले.

या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक श्री.अशोकभाऊ कोटेचा,सचिव श्री.प्रेमराजसेठ भाला,संचालक श्री.अरविंदभैय्या शिंगणे,श्री.बाबासाहेब मिनासे, श्री.सुहासजी जामदार श्री.भूषणजी डागा,श्री.गोपालजी बोरा,अमोलजी खेकाळे,स्थानिक सल्लागार श्री.छबुराव भावसार,ड धनश्यामजी भाला,दादासेठ व्यवहारे,माजी प्राचार्य श्री.सुभाषजी फटींग,श्री.एस.एम.भालेराव,श्री वानखेडे सर यांच्या सह प्राचार्य श्री.एस.बी.गारडे सर,पर्यवेक्षक श्री.एस.एन.व्यास आदी उपस्थित होते.

तसेच या महत्त्वपूर्ण बैठकीसाठी सर्व शिक्षक - शिक्षिका,प्राध्यापक - प्राध्यापिका,शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होत्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एस. बी. सरोदे सर यांनी केले तर,प्रास्ताविक प्राचार्य श्री.एस.बी गारडे सर यांनी केले आणि पर्यवेक्षक श्री एस एन. व्यास सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नेत्यांना गरज रस्त्यावरील अन् एसीतल्या कार्यकर्त्यांचीही

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला | प्रतिनिधी**

माढा लोकसभा निवडणुकीत प्रचाराचा धुरळा उडाला असून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असताना नेतेमंडळी विरोधकांवर प्रहार करत आहेत. नेत्यांनी केलेला टीका टिप्पणी मतदारांपर्यंत पोहोचविण्याचे काम सध्या उमेदवारांची सोशल मीडिया टीम करत आहे. माढा लोकसभेच्या निवडणुकीसाठी प्रचाराला धार आली असली, तरी उकाड्यामुळे दोन्ही उमेदवारांसह समर्थक, कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांचा घामटा निघत आहे. मतदानाचा दिवस जवळ येऊ लागल्याने दिवस थोडे अन् कामे जास्त असल्याने इलेक्शन हाय. आता वाईच सोसावं तर लागणारच की असे म्हणत कार्यकर्त्यांचीही उमेदवारांसमवेत पायपीट सुरूच आहे. माढा लोकसभेच्या मतदानासाठी कमी वेळ राहिला असल्यामुळे उमेदवारांची लोकसभा मतदारसंघात भिरकिट सुरू आहे. परंतु सध्या तीव्र उष्मा असून अंगाची लाहीलाही होत आहे. उन्हानं गाड्यांचे छत तापत आहेत. उमेदवार, नेतेमंडळी यांच्या दिमतीला अलिशान कार असल्यातरी पदाधिकारी, कार्यकर्ते वाहनांतून प्रवास करीत आहेत. वातानुकूलित कारच्या काचा खाली आल्या तरी उष्णतेच्या झळाआत येऊन नेतेमंडळी घामाघूम होत आहेत. माढ्याच्या आखाड्यात अटीतटीची झुंज असल्यामुळे कोणतीही कसर न सोडता नेत्यांसह कार्यकर्त्यांनी पायाला भिंगरी लावली आहे. माढा लोकसभा निवडणुकीमुळे राजकीय वातावरण तापत असतानाच तापमानाचा पारा ४० ते ४१ अंश सेल्सिअसपर्यंत आहे. याचा फटका प्रचार यंत्रणेला बसू लागला आहे. वाढत्या तापमानामुळे अंगाची लाहीलाही होत असली, तरी उमेदवार व कार्यकर्ते जमेल तसे जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. राजकारण आणि कार्यकर्ते हे समीकरण एकसंध असल्याने सध्या सगळीकडेच कार्यकर्त्यांना मागणी वाढत आहे. यंदाची निवडणूक सोशल मीडियावर गाजणारी असल्याने राजकीय क्षेत्रात डिजिटल कार्यकर्त्यांना खास वागणूक दिली जात आहे. त्यामुळे डिजिटल कार्यकर्ते एकत्र करून काल काय झालं, आज काय करायचं आणि उद्या काय असणार आहे याबाबत आढावा घेतला जात आहे. त्यामुळेच डिजिटल कार्यकर्त्यांचे वजन राजकीय नेत्यापुढे वाढले आहे. नेत्यांची मर्जी असावी म्हणून कार्यकर्ते गर्दी जमवण्यापासून रात्रंदिवस नेत्यांचा जप करत असतात.

संपादकीय

## मतदानाचा हक्क आणि विधिनिषेध

लोकशाही प्रक्रियेत मतदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. राजकीय पक्षांच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन करून मतदारांनी विवेकबुद्धी वापरून आपला हक्क बजावला पाहिजे.

सन २०२४ मधल्या लोकसभा निवडणुकीला आपण सामोरे जात आहोत. भारताचे क्षेत्रफळ, लोकसंख्या आणि वैविध्य इत्यादी पैलू तर कुणालाही थक्क करणारे आहेत. पण भारताच्या घटनासभेने स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर, 'आपला देश लोकशाही मार्गानेच या पुढची वाटचाल करील', अशी घोषणा केली. एकेका प्रौढ व्यक्तीला मतदानाचा हक्क बहाल केला.

१९५२ मध्ये लोकसभेची पहिली निवडणूक झाली, त्याला पंच्च्याहत्तर वर्षे झाली असताना आपण अठराव्या लोकसभेसाठी मतदान करत आहोत. या निवडणुकांचा धावता आढावा घेतला तरी भारतीय मतदारांविषयी अभिमान वाटेल, असा लोकशाहीचा प्रवास झाला, असा निष्कर्ष काढता येईल.

आपले पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद संविधान सभेतल्या एका भाषणात म्हणाले होते, 'मी खेड्यापाड्यात राहिलो आहे. माझ्या अनुभवाच्या आधारावर सर्वांना सांगतो की, या खेड्यापाड्यातला सर्वसामान्य माणूसही विवेकी वर्तन करतो. तेव्हा हा सर्वसामान्य भारतीय डोळे उघडे ठेवून मतदान करील आणि भारताचे भवितव्य घडवेल.'' बाबू राजेंद्र प्रसादांचे द्रष्टेपणच गेल्या साडेसात दशकातून सिद्ध झाले आहे.

आज एकशे चाळीस कोटींपेक्षा अधिक लोकसंख्येचा आपला देश जगाला सांगू शकतो की, आणीबाणीसारखी लोकशाहीवर आपत्ती ओढवली तेव्हा इथल्या जनसामान्यानेच तत्कालीन काँग्रेस सरकारला पराभवाची धूळ चारली. आश्चर्य म्हणजे, त्यानंतर अल्पावधीतच जनता पक्षाला पराभूत करून काँग्रेसच्याच इंदिरा गांधींना पुनश्च सत्ताधीश बनविण्यातही या मतदारानेच पुढाकार घेतला. देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी आलेल्या टी. एन. शेषन यांनी आदर्श आचारसंहिता काय असते आणि तिची कठोर अंमलबजावणी करता येते; त्याच्या चौकटीतच राजकीय पक्षांना प्रचार करावा लागतो, भले ते कोणही असो, याची जाणीव करून दिली.

२०१४ पासून उलटलेल्या दहा वर्षांत लोकशाही मार्गानेच आपण मूलगामी परिवर्तन राजकारणात घडवून आणले. खरे म्हणजे भारतात लोकशाही कशी रूजेल? इथे तर अराजकच माजेल, असा दावा करणारे पश्चिमी विचारवंत अशुभाचे प्रेषित व म्हणून मतदारांकडून बहिष्कृत ठरले. अर्थात आपल्या लोकशाहीमध्ये काही त्रुटी वा उणिवा जाणवत आहेत, त्यांचीही चर्चा केली पाहिजे.

सुजाण मतदारांचा धाक

अर्थात एका उल्लेखनीय कामगिरीची प्रारंभी दखल घेतली पाहिजे. सर्वच राजकीय पक्षांना आपल्या सुजाण मतदारांचा जणू धाक वाटत आहे. म्हणूनच भारतातून फुटून निघण्याची उक्ती वा कृती कोणीही करू शकत नाही. ज्या कम्युनिस्ट मंडळींना त्यावेळच्या सोव्हिएत युनियनचे कौतुक करण्याचा मोह होत असे वा वर्तमानात चीन हा मॉडेल देश वाटतो, त्यापैकी कुणीही तिथल्या एकपक्षीय झोटिंगशाहीचे आपण अनुकरण करावे, अशी शिफारस करण्यास धजत नाही.

अशा देशातून एकच उमेदवार रिंगणात असतो, पण समजा कुणा मतदाराला या उमेदवाराला नापसंत करायचे असेल तर त्याने मतदान केंद्रात वेगळ्या खोलीत जाऊन या उमेदवाराच्या मतपत्रिकेतल्या नावावर म्हणे फुली मारावी, अशी तरतूद तिथे अवश्य आहे. पण जो माणूस या खोलीत जाईल, त्याच्यावर पाळत ठेवण्याचीही व्यवस्था आहे. या परिस्थितीत कुणाची हे साहस खरीदण्याची हिंमत होईल?आपल्याकडे न्यायसंस्था स्वतंत्र आहे, प्रसारमाध्यमे मुक्त आहेत. सत्तारूढ पक्षाला विरोधकांच्या आक्षेपांना सामोरे जावे लागते. निवडणूक आयोग सत्तारूढ पक्षाला ताळ्यावर आणू शकतो. या वातावरणाचा योग्य लाभ उठविण्यासाठीच एकेका मतदाराने उमेदवाराच्या कर्तृत्वाचा विचार करावा. हा उमेदवार कोणत्या पक्षाच्या वतीने रिंगणात उतरला आहे, त्या पक्षाचे योगदान आणि त्रुटी विचारात घ्याव्यात.हा विशिष्ट पक्ष त्याच्या मूळच्या उद्दिष्टांशी इमान राखतो की नाही, यावर सुद्धा विचार करावा! अर्थात केवळ भावना, केवळ आवेश अन् अभिनिवेश यावर न विसंबता शांतपणे विचार करावा. डॉ. आंबेडकर सांगून गेले आहेत की, मतदानाचा अधिकार तर प्रत्येकाला मिळाला आहे, पण त्याच मतदाराला सामाजिक व आर्थिक विषमतेला तोंड द्यावे लागते.तेव्हा जो राजकीय नेता आणि पक्ष अशा विषमता निर्मूलनाबाबत निष्क्रिय असेल त्याला निवडून का द्यायचे? ज्या पक्षाच्या अंतर्गत कारभारात लोकशाही शून्यवत आहे, जिथे कार्यकर्त्यांची साखळीच नाही, जिथे केवळ लंबी चवडी भाषणबाजी आहे, तो पक्ष आपल्या देशाचे भविष्य कसे घडविणार? जो पक्ष केवळ निवडणूक जाहीर झाल्यावरच अस्तित्व दाखवतो आणि नंतर पाच वर्षांत कुठलेच काम करीत नाही, त्याला मत देण्यात काय लाभ आहे?गेल्या साडेसात दशकात धनशक्ती आणि मनगटाची शक्ती यांच्या बळावरच कुणी एखादा निवडणुकीत निवडून येतो आणि राजकीय पक्ष अशा मुजोरीसमोर शरण जातात, असे दिसून आले आहे. तेव्हा मतदारांनीच संघटित होऊन या धटिंगणाला पराभूत केले पाहिजे. जर एखादा राजकीय पक्ष या व्यक्तीला प्रसंगी साम, दाम, भेद वा दंड वापरून ताळ्यावर आणण्याची क्षमता बाळगत असेल तर त्या राजकीय पक्षाला मात्र मतदारांनी भरघोस मतांनी निवडून देण्याची आवश्यकता आहे.विद्यार्थी केवळ परीक्षार्थी होऊ नयेत, त्यांनी खऱ्या ज्ञानाची उपासना करावी! तसेच राजकीय पक्ष केवळ निवडणूक आल्यानंतरच जागे होऊन वृत्तपत्रांमधून वाजतगाजत असतील तर त्यांनाही मतदारांनीच ठिकाणावर आणावे. महत्त्व सत्तेला नाही, निरंतर जनसेवेला आहे! मतदार असाच सांगोपांग विचार करून आपला मतदानाचा हक्क बजावतील, अशी आशा करूया!

# महाराष्ट्र संविधान आणि लोकशाही वाचवण्याची रणभूमी आहे

आज भाजप पक्षाचे सर्वात शक्तिशाली नेतृत्व आणि तथाकथित आधुनिक राजकीय चाणक्यांना २०२४ च्या लोकसभा निवडणुकीबद्दलची मराठी माणसाची धारणा समजत नसल्याने दिल्ली अस्वस्थ झाली आहे. शिवसेनाप्रमुख आदरणीय बाळासाहेब ठाकरे हे २५ वर्षांहून अधिक काळ भाजपला बिनशर्त पाठिंबा देत आहेत हे सर्वांना माहीत आहे.

आणि भाजपसोबत युती करणारा शिवसेना हा पहिला राजकीय पक्ष होता. त्यावेळी भाजप हा धर्मनिरपेक्ष वातावरणात अस्पृश्य पक्ष होता. त्यावेळी प्रत्येक प्रादेशिक राजकीय पक्षांनी भाजपपासून अंतर ठेवले होते.

परंतु प्रमोद महाजन सारख्या सर्वकाळातील सर्वोत्कृष्ट राजकीय संयोजक व्यक्तिमत्वाने प्रत्येक आघाडीच्या राजकीय पक्षाच्या आणि सदस्यांच्या उच्च सन्मानाने सर्व गोष्टींचा योग्य समन्वय साधला.

आणि पहिल्यांदाच महान केंद्र सरकार भाजपने संसदेत सरकार स्थापन केल्याचा दावा केला की भारतातील आघाडीच्या राजकारणाचे सर्वकालीन सर्वोत्तम योजनाकार श्री प्रमोद महाजनजी होते.राजकारणातील युती भागीदारीची ही सुरुवात होती प्रादेशिक राजकीय पक्षांचे नेतृत्व राष्ट्रीय पातळीवरील राजकीय पक्ष करतील आणि भाजप नेते आदरणीय अटलबिहारीजी वाजपेयी ती जबाबदारी अत्यंत संवेदनशीलतेने पार पाडली. आणि दोनदा अटलजींनी भारताचे पंतप्रधान म्हणून अत्यंत यशस्वी आणि दर्जेदार नेतृत्व आणि मानवतेच्या कवी स्पर्शाने भारताचे नेतृत्व केले.दिल्ली सरकारमधील काँग्रेस पक्षाच्या पारंपारिक सत्तेला पर्यायी नेतृत्व देण्यासाठी प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षांच्या सत्तेतील विरोधी पक्षांचा सुवर्णकाळ सुरू झाला आहे.जवळपास एनडीएच्या भागीदारांनी भाजपसोबत भागीदारी सुरू ठेवली आणि भाजपचा आघाडीचा भागीदार म्हणून १० वर्षांच्या दीर्घ कालावधीसाठी विरोधी बाकावर बसले.२०१४ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री श्री नरेंद्रभाई मोदी यांची गोव्यातील पक्ष परिषदेत पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून घोषित करण्यात आलेली भूमिका राष्ट्रीय राजकारणाला वेगळ्या अंगाने वळण देणारी होती.

भाजपसोबत पक्षांची युती अत्यंत सौम्यपणे सुरू होती. त्यांनी अकाली दल शिवसेना आणि नितीश कुमार जनता दल या भाजप आघाडीच्या पक्षांसोबत निवडणूक लढवली. आणि भाजप प्रथमच वैयक्तिकरित्या सत्तेत आला युती भागीदाराच्या मदतीने हे पहिल्या पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी चालू ठेवण्यात आले होते परंतु २०१९ च्या दुसऱ्या निवडणुकीत भाजपने स्वतःच्या रंगात बदल केला होता जो युतीच्या भागीदारांसाठी अज्ञात होता.शेतकऱ्यांवर कारवाई करणाऱ्या केंद्र सरकारच्या निषेधार्थ अकाली दलाच्या केंद्रीय मंत्र्याचा राजीनामा भाजपसोबतची युती संपुष्टात येण्याची ही सुरुवात होती. भाजपने अत्यंत कुशलतेने भाजप सरकारमधून भागीदाराने बाहेर पडावे, असे वातावरण तयार करून ते भाजपसोबत टिकू नयेत यासाठी योग्य ते सर्व नियोजन केले आणि त्यात भाजप यशस्वी झाला. विधानसभा निवडणुकीत शिवसेना काँग्रेस आघाडीत सामील झाली आणि त्यांच्या केंद्रीय मंत्र्यांनी त्यांच्या खात्यांचा राजीनामा दिला आणि ते भाजप सरकारमधून बाहेर पडले. मग शिवसेनेला उभ्या उभ्या उध्वस्त करण्याची किंवा उध्वस्त करण्याची भव्य योजना केंद्रीय तपास यंत्रणांच्या मदतीने पूर्ण झालेली नैसर्गिक प्रतिक्रिया दिसायला हवी. शिवसेना पक्ष आणि शिवसेना विचारसरणीचे जनक श्री. बाळासाहेब ठाकरे होते. पण पडद्यामागे शिंदे यांचा चेहरा बंडखोर असल्याचा भाजपचा दावा आहे, असा दावा प्रसारमाध्यमांमध्ये केला जात.....? केंद्र सरकारच्या पाठिंब्याने कायदेशीररीत्या बेकायदेशीररीत्या वेगाने घडत असलेल्या गोष्टी महाराष्ट्रातील सामान्य माणसाला धक्का बसला आणि महाराष्ट्रातील राज्यपालांचे घर अतिशय सक्रियपणे राजकीय होते. वेगवान क्शन थ्रिल आणि सस्पेन्स चित्रपटाप्रमाणे सर्व काही घडत होते. भारताचे सर्वोच्च कायदेविषयक सल्लागार लंडनमध्ये बसून भारतात खटला लढवत होते, सर्वकाही अनपेक्षितपणे अविश्वसनीय होते, परंतु हे घडत होते हे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीसाठी अगदी नवीन होते. खरे तर एके काळी शिवसेना पक्षाचे मुख्यमंत्री श्री नारायण राणे भाजपचे सदस्य झाले आणि त्यांना सोडून भाजपमध्ये भाजपचे प्रदेश नेते म्हणून भाजपचे शिवसेनेला आव्हान होते. प्रत्येक चांगल्या किंवा प्रतिष्ठित शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्याला राज्य भाजपने उचलून धरले पण तोपर्यंत शिवसेनेने कधीही तसे केले नाही भाजपने कधीही शिवसेनेत भाजपच्या कोणत्याही नेत्याला स्वीकारले नाही, मैत्रीचा आदर केला. पण मोदींच्या काळातील भाजपची नवी राजकीय शैली प्रत्येक राजकीय पक्षाला माहीत नव्हती आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यासारख्या भाजपसोबतच्या युतीपासून सर्व पक्ष घाबरून बाहेर पडले. ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री श्री रामविलास जी पासवान यांच्या निधनानंतर भाजपने पासवान कुटुंबातील कुटुंबासोबत भांडणे लावली आणि नेहमीप्रमाणेच दूर राहून पाहत राहावे. तीच गोष्ट त्यांनी आंध्रमध्ये चंद्राबाबू नायडूंसोबत केली. पूर्ण बहुमत असलेल्या भाजप सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात त्यांनी कधीही छऊ- हा शब्द वापरला नाही ज्यावेळी त्यांना भजपा सरकार म्हणायचे आज ते मोदी सरकार म्हणत आहेत. पण जेव्हा त्यांना पक्षांतर्गत सर्वेक्षणातून कळले की ते एकटे निवडणूक लढण्यासाठी सुरक्षित स्थितीत नाहीत तेव्हा त्यांना दिल्लीतील सत्ता गमवावी लागू शकते.मग ते एनडीए युतीचे जुने गाणे म्हणू लागले, हा तथाकथित चाणक्याच्या नेतृत्वाखाली नवा भाजप आहे. पण सगळेच नाकारत होते आणि भाजपने केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर त्यांच्या जुन्या मित्रांविरुद्ध करायला सुरुवात केली आणि त्यांना जबरदस्तीने एनडीएचे सदस्य बनवले. बिहारचे मुख्यमंत्री श्री नितीश कुमार यांच्याबद्दल अभ्यास केल्यास त्यांचा चेहरा आणि शरीर मैत्रीच्या राष्ट्रीय राजकारणातील सध्याच्या राजकीय क्षेत्राबद्दल बरेच काही बोलते. राजकारणात देहबोली खूप महत्वाची आणि इच्छा आणि अनिच्छेतील फरकाची भाषा डीकोड करणारी व्यक्तीने ती अत्यंत काळजीपूर्वक वाचली पाहिजे. आज माननीय पंतप्रधान भाजप आणि युतीच्या भागीदारासाठी दररोज एक जाहीर सभा घेत आहेत. केंद्रीय गृहमंत्रीही महाराष्ट्रात मेहनत घेत आहेत. महाराष्ट्र भाजप पक्षाला खूश करण्याच्या मनस्थितीत का नाही, यामागे काही मोठी कारणे आहेत जी महाराष्ट्राच्या राज्य नेतृत्वाने टाळली आहेत. खरे तर काही प्रमुख कारणे अगदी साधी होती पण आजच्या महाराष्ट्रातील भाजप पक्षाला ती फार महागात पडली आहे. महाराष्ट्रातील पहिली ज्वलंत समस्या म्हणजे शेतकरी आत्महत्या आणि बहुतांश शेतकरी मराठा समाजातील आहेत आणि रोज आत्महत्या करत आहेत. ही दुर्दैवी आत्महत्येची साखळी खूप दिवसांपासून सुरू आहे ही वेदनादायक आहे पण खऱ्या समस्येवर कोणीही संशोधन करत नाही. आणि प्रमुख शेतकरी समाज म्हणून मराठा समाजाला अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.आणि त्यातून ज्वलंत सामाजिक आर्थिक शैक्षणिक आणि नोकरी आणि शिक्षणाचा संकल्प लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय बनतो. त्यानंतर जालना जिल्ह्यातील अंतरवली सारथी या छोट्याशा गावात उपोषण सुरू झाले. कुणबी मराठा आरक्षणासाठीचे ते शांततेत उपोषण सक्तीने संपवण्याचा सरकारी आदेश पोलिसांच्या गोळीबारात झाला.कुणबी मराठा आरक्षणाचे नेतृत्व करणारा तरुण आणि गरीब शेतकऱ्याचा मुलगा श्री मनोज जी जरंगे पाटील हे आज महाराष्ट्रातील कोणत्याही राष्ट्रीय किंवा राज्याच्या नेत्यापेक्षा सर्वात लोकप्रिय आणि जननेते आहेत. मुळात भाजपने हा सामाजिक मुद्दा अतिशय हलक्यात घेतला. आणि केंद्र सरकारच्या धोरणात ते गेल्या ५ वर्षांपासून करत आहेत नेहमीप्रमाणे ते अगदी हलकेच घेतले.सामाजिक दृष्ट्या राजकीय आर्थिक दृष्ट्या औद्योगिक दृष्ट्या सर्वच बाबतीत महाराष्ट्र मागासलेले राज्य बनले आहे ही मराठी समाजाच्या मोठ्या वर्गाची जनमानसाची धारणा आहे.मराठी सरकारी शाळांचे खाजगीकरण आणि सर्व सरकारी शाळांची मालमत्ता अदानी कंपनीला सोपवल्याने आज लोकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक उद्योग आणि महत्त्वाची सरकारी व खाजगी औद्योगिक कार्यालये अहमदाबादला स्थलांतरित होणे, हा मराठी माणसाचा अपमान आहे, ही जनमानसाची धारणा आहे. आज महाराष्ट्राची राजकीय सामाजिक संस्कृती भाजपने राजकीय फायद्यासाठी पूर्णपणे विस्कळीत केली आहे हे कटू सत्य आहे पण सत्य बोलण्याचे धाडस कोणी करत नाही. शेवटी भाजपने त्यांचे मूळ मित्र कोणत्या राजकीय किंमतीवर गमावले आणि आता कोणत्याही राजकीय व्यक्तीला भाजपशी असलेल्या मैत्रीवर विश्वास नाही, ही आज महाराष्ट्राच्या राजकारणात परिस्थिती आहे. भाजप महाराष्ट्रात नवीन राजकारणाची स्वतःची संस्कृती प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु महाराष्ट्रातील लोक भाजपच्या या जबरदस्तीने बदललेल्या राजकीय वर्चस्व संस्कृतीवर खूश नाहीत. त्या आरशाच्या प्रतिकृती आज भाजपच्या लोकशाहीतील विजय-पराजयाच्या दारात थेट समोर येत आहेत. एक राजकीय विश्लेषक म्हणून इथे एक साधा प्रश्न पडतो की भाजप त्यांच्या खऱ्या मित्रांचे शत्रू का बनले आज ते सर्वस्व गमावून बसले आहेत एक दिवस भाजपसाठी महाराष्ट्र तमिळनाडूसारखा होईल. कारण महाराष्ट्राने ऐतिहासिकदृष्ट्या सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय भिन्न शौर्य आणि बलिदानाच्या मातीत स्वाभिमान मिळवला आहे. महाराष्ट्राच्या भूमीवर जगातील प्रत्येक समाजाला स्वीकारण्याचे मोठे हृदय असलेले महाराष्ट्र राज्य आज स्वाभिमान राखण्यासाठी लाचार झाला आहे. ही भावना प्रत्येक मराठी माणसाच्या मनात आहे. राजकीय सामाजिक आर्थिक आणि धार्मिक तसेच अध्यात्मिक आणि संत परंपरेने भारतच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडात खूप समृद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासाठी मुंबईच्या समुद्रात जगातील सर्वात मोठा पुतळा उभारण्याची घोषणा भाजपने जवळपास १० वर्षांपूर्वी केली होती. भाजपने स्वयंघोषणा केल्या असे कोणीही सांगितले नाही किंवा तसे करण्याची मागणीही केली नाही.पण दुर्दैवाने ट्रिपल इंजिन सरकारने श्री शिवस्मारकाबाबत काहीही केले नाही. भाजप सरकारच्या या निष्काळजीपणामुळे जनतेला अपमानास्पद वाटते कारण श्री छत्रपती शिवाजी महाराज हे मराठी संस्कृती आणि मराठी मातीचे प्राण आहेत. राजकीय सर्वेक्षणात या सामाजिक ऐतिहासिक आर्थिकदृष्ट्या औद्योगिकदृष्ट्या प्रत्येक क्षेत्राचा विचार अत्यंत संवेदनशील मनाने केला पाहिजे. पण आता राजकीय सर्वेक्षण जवळजवळ चुकीचे आणि भ्रष्ट असल्यासारखे आहे. आज महाराष्ट्रातील भाजपसाठी प्रत्येक सामाजिक राजकीय ऐतिहासिक चूक कधीही भरून न येणाऱ्या जखमेसारखी झाली आहे. भाजप आज जगातील सर्वात श्रीमंत पक्षांपैकी एक आहे, त्यांची सोशल मीडिया सेना आज जगातील सर्वात शक्तिशाली सेना आहे, परंतु ते खूप लहान गोष्टी विसरले आहेत की आपण देशातील लोकांचे मन जिंकू शकत न्यायाच्या भूमीत आणि हुकूमशाही मानसिकतेविरुद्धच्या लढ्याचा प्रकाश, ही मराठी संस्कृतीची आणि मातीची मूलभूत शिकवण आहे ती स्वराज्य संस्कृतीमुळे प्रत्येक मराठी माणसाला येते. आणि सर्वात लोकप्रिय महान ऐतिहासिक समाजसुधारक आणि भारताच्या संविधानाचे जनक भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हीच त्यांची भूमी अभिमानाने संघर्ष आणि स्वाभिमानाने ओळखली जाते. आज प्रत्येकाच्या मनात प्रचंड भीती कुठे आहे, भारताची राज्यघटना बदलण्यासाठी केंद्र सरकारला ४०० संसदीय जागा हव्या आहेत, ही प्रत्येक महाराष्ट्रीयनची अत्यंत गंभीर धारणा आहे. हे मोदी सरकार भारताची राज्यघटना बदलू शकते याची शाश्वती असलेल्या सामान्य माणसाला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अनेक दुरुस्त्या झाल्यामुळे अधिक भीती निर्माण झाली आहे. ३८% पेक्षा जास्त मतदारांनी मोदी सरकारच्या विरोधात मतदान केले कारण या पुष्टी धारणा आहे कारण सोशल मीडियावर भाजप समर्थक उघडपणे आव्हान देत आहेत की ते भारताचे संविधान बदलणार आहेत. भारताचे संविधान कोणीही बदलू शकत नाही हे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी साहेब नेहमी सांगत असतात पण त्यांचे समर्थक सोशल मिडीयावर उघडपणे धमक्या देत असतात पण कारवाई होत नाही. आणि मोदी सरकारबद्दल आणखी एक हमी सामान्य माणसाला आहे पण मोदी सरकार नोटबंदी सारखे काहीही करू शकते अचानक भारताचे संविधान बदलण्याचा निर्णय ४००+ संसदीय जागांवर विजय अवलंबून आहे आणि आता सामान्य माणूस भारताच्या संविधानाचे रक्षण करण्यासाठी आणि मोदी सरकारच्या विरोधात मत देण्यासाठी लढत आहे. आज राज्य आणि केंद्र सरकार अतिआत्मविश्वासाने पूर्णत: सर्वेक्षण कंपनीवर अवलंबून आहे. महाराष्ट्रात शिवसेनेच्या राष्ट्रवादी या पक्ष चिन्हावरून चातुर्याने कायदेशीर वाद निर्माण झाला. कोण करतंय सगळी जादू सामान्य माणूस गांभीर्याने पाहत आहे.महाराष्ट्राचा राजकीय भ्रम हा सामाजिक धारणेचा भ्रम बनला आहे आणि सामाजिक परिणामांचा हा भ्रम भाजपसाठी महाराष्ट्रात गंभीर राजकीय आणि सामाजिक समस्या निर्माण करत आहे.(वर्तमानाच्या राजकीय आणि सामाजिक विश्लेषणाचा पहिला भाग )

# मॉर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीज!

अमेरिकेच्या सरकारने या शोधाचे हक्क विकत घेण्यास नकार दिल्यावर मॉर्स यांनी स्वतःची कंपनी स्थापन केली. तारायंत्राचा प्रसार लवकरच झपाट्याने वाढला व बहुतेक देशांनी त्याचा वापर करण्यास सुरुवात केली. तथापि लगेचच मॉर्स यांच्यावर त्यांचे भागीदार व प्रतिस्पर्धी संशोधक यांनी शोधाच्या अधिकाराबाबत दावे लावले. अतिशय खर्चिक न्यायालयीन खटल्यांचा दीर्घ मालिकेनंतर इ.स.१८५४ साली अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मॉर्स यांचा एकस्व अधिकार मान्य केला. अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर तारायंत्र संदेशवहन जसजसे वाढत गेले, तसतशी मॉर्स यांची कीर्ती व संपत्तीही वाढत गेली. वृद्धापकाळात त्यांनी परोपकाराच्या उदात्त हेतूने ते स्वतः संस्थापक व विश्वस्त असलेल्या व्हॅसर कॉलेजला, त्यांच्या येल कॉलेज या मातृसंस्थेला, धार्मिक संस्थांना व संघटनांना तसेच गरीब कलाकारांना सढळपणे आर्थिक मदत केली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना अनेक बहुमान मिळाले. मॉर्स यांच्या स्वतःच्या आयुष्यातच तारायंत्रामुळे जगाचे स्वरूप कितीतरी बदलले.

मॉर्स- मोर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीझ हे अमेरिकन चित्रकार व विद्युत चुंबकीय तारायंत्राचे जनक होत. मॉर्स यांचा जन्म दि.२७ एप्रिल १७७१ रोजी चार्ल्सटाऊन-मॅसॅचूसेट्स येथे झाला. त्यांचे शिक्षण अँडोव्हर येथील फिलिप्स कॅडमीत व पुढे येल कॉलेज येथे झाले. विद्यार्थी दशेतच त्याकाळी फारसे आकलन न झालेल्या विद्युत या विषयावरील व्याख्यानामुळे त्यांना गोडी निर्माण झाली. त्याच वेळी त्यांना लघू व्यक्तिचित्रे काढण्याचा छंद जडला. तथापि त्यांच्या वडिलांना त्यांचा हा छंद पसंत नव्हता. सन १८१०मध्ये पदवी संपादन केल्यावर त्यांनी बॉस्टन येथील एका ग्रंथ प्रकाशकाकडे कारकुनाची नोकरी पत्करली. त्या काळचे प्रख्यात अमेरिकन चित्रकार वॉशिंग्टन ऑल्स्टन व गिल्बर्ट स्टूअर्ट यांनी मॉर्स यांच्या चित्रकलेच्या व्यासंगाला प्रोत्साहन दिले. सन १८११ साली ऑल्स्टन यांचे विद्यार्थी म्हणून ते इंग्लंडला चित्रकलेच्या अभ्यासासाठी गेले. तेथील त्या कलेच्या वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक शैलीचा-दंतकथा व ऐतिहासिक घटना यांच्या अद्भूत चित्रणाचा त्यांनी स्वीकार केला. तथापि १८१५ मध्ये ते अमेरिकेला परतले तेव्हा अमेरिकन लोकांना त्यांच्या ऐतिहासिक चित्रांत रस नाही, असे त्यांना दिसून आले. त्यामुळे नाइलाजाने त्यांना अर्थार्जनासाठी व्यक्तिचित्रे रंगविण्याचा व्यवसाय पुन्हा पत्करावा लागला. त्यांनी न्यू इंग्लंड, न्यूयॉर्क व द.कॅरोलायना या राज्यांत 'फिरते चित्रकार' म्हणून सुरुवात केली. इ.स. १८२५नंतर न्यूयॉर्क शहरात स्थायिक झाल्यावर त्यांनी काही अप्रतिम व्यक्तिचित्रे रंगवली. त्यांतील मार्क्विस दी लाफायेत यांची दोन व्यक्तिचित्रे विशेष उल्लेखनीय आहेत.

इ.स.१८१७मध्ये त्यांनी आपले धाकटे बंधू सिडनी एडवर्ड्स मॉर्स यांच्या समवेत पंपासंबंधीची तीन एकस्वे- पेटंटे मिळविली होती. संगमरवरावर कोरीव काम करण्याचे एक यंत्र त्यांनी सन १८२३मध्ये विकसित केले. त्यानंतर विद्युत विषयक प्रयोगांत त्यांनी सातत्याने विशेष रस घेतला. सन १८३२मध्ये फ्रान्सहून जहाजातून परत येतानाच्या प्रवासात चार्लस टी.जॅक्सन यांनी मॉर्स यांना लांब अंतरावर विद्युत प्रेषण करणारे व फ्रान्समध्ये मिळवलेले एक उपकरण दाखविले. यामुळे मॉर्स यांना विद्युत व तारायंत्र या विषयांत अधिक स्वारस्य निर्माण झाले. पुढील तीन वर्षे त्यांनी अनेक प्रयोग करून सन १८३५मध्ये पहिले विद्युत चुंबकीय तारायंत्र उपकरण केले. यात एक विद्युत मंडल चालू व बंद करून संकेत प्रेषण करणारा प्रेषक, संकेतांची नोंद करणारा विद्युत चुंबकीय ग्राही आणि संकेतांचे अक्षरे व संख्या यात रूपांतर करणारी सांकेतिक लिपी यांचा समावेश होता. त्यांनी योजलेली ठिपके- डॉट्स व प्रास- डॅशेस यांवर आधारलेली सांकेतिक लिपी अद्यापही त्यांच्या नावाने ओळखली जाते. ज्यात कट्ट व कड या दोन ध्वनींच्या साहाय्याने ठिपका व प्रास दर्शविले जातात. पुढे त्यांनी अधिक लांब अंतरावर संदेश पाठविण्यासाठी विद्युत चुंबकीय अभिचलित्रांच्या प्रणालीचा शोध लावला. त्यांच्या शोधाच्या विकासात त्यांना एल.डी.गेल व जोझेफ हेन्री यांचे तांत्रिक साहाय्य आणि ल्फ्रेड व्हेल यांचे आर्थिक साहाय्य लाभले. मॉर्स यांनी सन १८३७मध्ये आपल्या शोधाच्या एकस्वाकरिता अर्ज केला, परंतु त्यांना आपल्या शोधाला मान्यता मिळवण्यास जवळजवळ सात वर्षे वाट पहावी लागली. शेवटी सन १८४३मध्ये अमेरिकेच्या काँग्रेसने वॉशिंग्टन ते बाल्टिमोर यांच्या दरम्यान तारयंत्राद्वारे प्रायोगिक संदेशवहन प्रस्थापित करण्यासाठी तीस हजार डॉलरचे अनुदान मंजूर केले. दि.२४ मे १८४४ रोजी या योजनेद्वारे पहिला संदेश प्रेषित करण्यात आला.

मॉर्स यांच्यात नेतृत्वाचेही गुण होते. रंगभूमीवरील स्वैराचार विरुद्ध मोहीम उघडण्याचा एक भाग म्हणून त्यांनी सन १८२७मध्ये न्यूयॉर्क येथे जर्नल ऑफ कॉमर्स हे रंगभूमीसंबंधीच्या जाहिराती स्वीकारण्यास नकार देणारे नियकालिक स्थापन करण्यास मदत केली. चित्रकारांना मदत करण्यासाठी व अमेरिकन जनतेची कलाविषयक अभिरुची उंचावण्यासाठी नॅशनल कॅडेमी ऑफ डिझाइन या सन १८२६मध्ये स्थापन झालेल्या संस्थेचे ते एक संस्थापक व पहिले अध्यक्षही होते. सन १८३२-३६ या काळात त्यांनी नेटिव्ह अमेरिकन चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. तिच्यातर्फे न्यूयॉर्क शहराच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणूनही ते उभे राहिले होते. परंतु राजकारणातील त्यांचा सहभाग अयशस्वी ठरला. सन १९२२मध्ये ते युरोपला गेले आणि तेथे अभ्यास, प्रवास व चित्ररेखाटन यांत तीन वर्षे त्यांनी खर्च केली. सन १८३२मध्ये अमेरिकेला परतल्यावर न्यूयॉर्क विद्यापीठात चित्रकला व शिल्पकला या विषयांच्या प्राध्यापकपदावर त्यांची नेमणूक झाली. पुढे तेथेच ते संकल्प चित्रकलेच्या वाङ्मयाचे प्राध्यापक झाले होते.मॉर्स यांचे देहावसान वयाच्या ९९व्या वर्षी न्यूयॉर्क येथे दि.२ एप्रिल १८७२ रोजी झाले. त्यांच्या मृत्यूनंतर तारायंत्राचे जनक ही त्यांची कीर्ती दूरध्वनी, रेडिओ व दूरचित्रवाणी यांच्या शोधामुळे पुसट होत गेली, तथापि चित्रकार म्हणून त्यांची ख्याती मात्र वाढली आहे. त्यांची व्यक्तिचित्रे जगातील अनेक संग्रहालयांत प्रदर्शित केली गेलेली आहेत. त्यांचे तारायंत्र उपकरण वॉशिंग्टन येथील नॅशनल म्युझियम ऑफ हिस्टरी अँड टेक्नॉलॉजी या संग्रहालयात जतन करून ठेवण्यात आले आहे. !! जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या लोकोपयोगी संशोधनास विनम्र अभिवादन !!

दैनिक लोकनेता



# खासदार सुजय विखे यांनी नगर शहरात भरीव अशी कामे केली...

# पण कोणत्याही प्रकारची जाहिरात केली नाही-धनश्री विखे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर शहर वासियांचा अनेक वर्षाचा पाण्याचा प्रश्न खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी मार्गी लावला आहे. केंद्र सरकारची अमृत पाणी योजना रखडली होती मात्र पाठपुरावा करून योजना पूर्ण केली आणि नगरकरांना पूर्ण दाबाने पाणी दिले. सर्वसामान्य नागरिकांना डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकारच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत घेऊन जाण्याचे काम केले आहे. आपल्या सर्वांना लोकसभेमध्ये सुशिक्षित खासदार म्हणून डॉक्टर सुजय विखे पाटील यांना पाठवायचे आहे. नगर जिल्ह्यामध्ये तीन एमआयडीसी मंजूर झाल्या असून या माध्यमातून युवकांना रोजगार निर्मिती होईल.वयोश्री योजनेच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मोफत लाभ मिळाला आहे. खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केलेल्या कामाची जाहिरात केली नाही असे प्रतिपादन धनश्री विखे पाटील यांनी केले.

नगर दक्षिण लोकसभेचे भाजप महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांना नालेगाव येथील श्री देवांग पंच कोष्टी समाज यांनी जाहीर पाठिंबा दिला असून यावेळी ड.धनंजय जाधव,अजय चितळे,सोनाली चितळे, उदय अनभुले, गणेश शिंदे, प्रफुल्ल लाटणे, अशोक फलके, रुपेश मोकोटे, सागर दळवे, सुभाष पाखले, संजय भंडारी, संतोष टेके, नितेश वराडे,उमेश टेके, गणेश लाटणे, रविंद्र टकले, सुरेंद्र असलकर, गणेश कांबळे, विजय खटावकर,पूजा दळवे, सुप्रिया पाखले, रुपाली मुकोटे, जयश्री लाटणे, सुनीता टेके, उज्वला टकले, सीमा लोटके,अंबिका टेके आदी उपस्थित होते. लोकसभा निवडणूक ही देशाच्या विकासासाठी असून या ठिकाणी चांगले लोकप्रतिनिधी निवडून जाणे गरजेचे आहे खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी मागील पाच वर्षांमध्ये विकासाच्या योजनांबरोबरच सामाजिक,शैक्षणिक, धार्मिक या विषयावर चांगले काम केले आहेत. त्यांची अभ्यासू खा. म्हणून लोकसभेमध्ये ओळख आहे. त्यामुळेच शहर विकासासाठी मोठा निधी प्राप्त झाला आहे. नागरिकांचे उड्डाणपुलाचे अनेक वर्षांचे स्वप्न पूर्ण झाले यासाठी श्री. देवांगपंच कोष्टी समाजाने जाहीर पाठिंबा दिला आहे अशी माहिती कोष्टी समाजाच्या वतीने दिली.खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी नगर शहर सुरक्षित राहावे यासाठी विविध भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले. कोरोना काळामध्ये केलेल्या कामाची खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यांनी जाहिरात केली नाही मात्र ते आज आपल्याला कामाच्या माध्यमातून सर्वत्र दिसत आहेत असे मत अजय चितळे यांनी व्यक्त केले.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती उत्सव सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती सोहळा गेल्या दोन वर्षापासून केडगाव मधील देवी मंदिरासमोर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो यावर्षी देखील जयंती सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने तेथील नागरिकांनी आंबेडकर जयंतीचा सोहळा पाहण्यासाठी उस्फूर्त प्रतिसाद दिला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या सोहळ्यामध्ये वैचारिक व सांस्कृतिक उपक्रम घेण्यात आले. व भोजनाची देखील व्यवस्था करण्यात आली होती त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा १३ फुटी भव्य दिव्य पूर्णा कृती पुतळा तेथील प्रमुख आकर्षण ठरले त्याचबरोबर प्रथमच आंबेडकर



जयंती ची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरतीने व महात्मा जोतीराव फुले यांना मानवंदना करून झाली. अशा सर्व महापुरुषांचा वारसा जपणारी जयंतीची सुरुवात प्रथमचं नगर जिल्ह्यातील केडगाव उपनगरातील देवी चौक येथून सामाजिक कार्यकर्ते आण्णासाहेब शिंदे व आंबेडकरी चळवळीतील शुभम प्रकाश गायकवाड यांच्या वतीने काढण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उद्योजक सचिन आबा कोतकर समवेत नगरसेवक मनोज दादा कोतकर, बाळासाहेब कोतकर, संचालक शाम कोतकर, अण्णासाहेब शिंदे, नवनाथ कोतकर, अजित कोतकर, सरपंच राहुल आल्हाट, भूषण गुंड, विशाल भिंगारदिवे, बाळासाहेब शिंदे, कृष्ण काकडे, सागर ठोंबे, अक्षय ठोकळ, करण सुर्वे, अक्षय भोसले, बाळू गमरे, निखिल निकाळजे, राहुल शिंदे, सुदर्शन ठोबे, संकेत निकाळजे, सार्थक लांडे आदी उपस्थित होते.यावेळी औरंगाबाद येथील व्याख्याते धम्मचारी ललित सिद्धी यांच्या व्याख्यानातून छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा फुले यांचा वैचारिक वारसा व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल माहिती दिली.

# श्री गोविंद गिरीजी महाराज २ दिवस परभणी दौऱ्यावर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी । प्रतिनिधी**

प.पु. गुरुवर्य आचार्य स्वामी श्री गोविंद गिरीजी महाराज यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने २९ व ३० एप्रिल रोजी येथील अक्षदा मंगल कार्यालयात स्वामीजींच्या उपस्थितीत ‘प्रणिपात पर्व’ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या दोन दिवशीय सोहळ्यात उपनयनसंस्कार उत्सव, संवाद गर्भस्थ शिशुसे यावर व्याख्यान व तुलादान व आशीर्वचन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. विद्यावाचस्पती राष्ट्रसंत गुरुवर्य आचार्य स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून भव्य तुलादान सोहळाही आयोजित करण्यात आला आहे. या स्मरणीय उत्सवात ७५ यजमानांद्वारे तूलादान होणार आहे व स्वामीजींचे आशीर्वचनही होणार आहे. यावेळी गिरीधरजी काळे (पुणे) व सुशील बजाज (हैद्राबाद) हे दोघे उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याचे मुख्य यजमान म्हणून गोविंदप्रसाद अजमेरा हे असणार असून मंगळवारी सकाळी १० वाजता हा तूलादान सोहळा होणार आहे.दरम्यान, या प्रणिपात पर्व सोहळ्याचे संयोजक वेदशास्त्रसंपन्न श्री अतूलगुरु जोशी साळापुरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

# महादेव बेटिंग ॲप प्रकरणात अभिनेता साहिल खानला अटक




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

महादेव बेटिंग ॲपप्रकरणी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलच्या एसआयटीने अभिनेता साहिल खान याला काल छत्तीसगडमधून अटक केली. आज पोलिसांच्या पथकाने त्याला विमानाने मुंबईत आणून उच्च न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला १ मेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

साहिल खानवर बेटिंग साइट चालवण्याचा आणि बेटिंग पचा प्रचार केल्याचा आरोप आहे. मुंबईच्या माटुंगा पोलिसांच्या महादेव बेटिंग प प्रकरणाच्या तपासात साहिल खानचे नाव पुढे आले होते. त्यानंतर एसआयटीने नुकतीच साहिलची चौकशी केली होती. असे सांगितले जाते की साहिल लोटस बुक २४/७ नावाच्या बेटिंग प वेबसाइटचा भागीदार आहे, ही वेबसाईट महादेव बेटिंग प नेटवर्कचा भाग आहे.

मुंबई सायबर सेलची एसआयटी काही आर्थिक आणि रिअल इस्टेट कंपन्या आणि वादग्रस्त महादेव बेटिंग पच्या प्रवर्तकांमधील कथित बेकायदेशीर व्यवहारांची चौकशी करत आहे. या प्रकरणी पोलिसांनी नोंदवलेल्या एफआयआरनुसार हा घोटाळा अंदाजे १५ हजार कोटी रुपयांचा आहे.

या प्रकरणी साहिल खान आणि अन्य ३१ जणांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यांची चौकशी सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तपासात त्याची बँक खाती, मोबाईल फोन, लॅपटॉप आणि सर्व तांत्रिक उपकरणे तपासण्यात आली आहेत.

साहिल खानवर लायन बुक पचा प्रचार आणि कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचा आरोप आहे. लायन बुकची जाहिरात केल्यानंतर त्याने भागीदार म्हणून लोटस बूक २४/७ प लॉंच केले. पच्या प्रचारासाठी साहिलने आपला प्रभाव वापरला. तो सेलिब्रिटींना आमंत्रित करायचा आणि भव्य पार्ट्यांचे आयोजन करायचा.अभिनेता साहिल खान त्याच्या फिटनेससाठी ओळखला जातो. एक्सक्यूज मी आणि स्टाईल सारख्या चित्रपटात त्याने काम केले आहे. मात्र, अभिनयाच्या क्षेत्रात तो फारसा यशस्वी ठरला नाही. त्यामुळे त्याने ते क्षेत्रच सोडून दिले. यानंतर त्याचा फिटनेस प्रवास सुरू झाला आणि तो फिटनेस एन्फ्लूएन्सर बनला. साहिल डिव्हाईन न्यूट्रिशन नावाची कंपनी चालवतो. ही कंपनी बॉडी बिल्डिंगसाठीची सप्लिमेंट्स विकते.

# महाराष्ट्रदिनी माझी लोकशाही-माझा फळा फलकलेखन स्पर्धेचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सिद्धाराम सालीमठ यांच्या निर्देशानुसार अहमदनगर-शिर्डी लोकसभा मतदारसंघातील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी, बाळासाहेब कोळेकर यांच्या संकल्पनेतून १ मे-महाराष्ट्रदिनी शाळांमध्ये शैक्षणिक निकाल घेण्यासाठी आलेल्या पालकांमध्ये मतदार जनजागृती व्हावी म्हणून अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या वतीने शिक्षक, कलाशिक्षक व कलाकारांसाठी माझी लोकशाही-माझा फळा या फलकलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

माझा भारत-माझं मत, १३ मे रोजी मतदान कराच,अहमदनगर-शिर्डीच्या मतदार राजा जागा हो १३ मे रोजी मतदानाचा धागा हो यापैकी एका विषयावर




आकर्षक व संकल्पनायुक्त फलकलेखन करावयाचे असून शाळा , शासकीय कार्यालये ,धार्मिक स्थळे,चौकातील फळे,नोटीस-सूचनाफलक आदी फलकांचा वापर करता येईल.आकर्षक रंगसंगतीच्या फलकलेखनाबरोबरच फलक आरेखन व सजावट देखील स्पर्धक करू शकतात तसेच मतदानाची १३ मे २०२४ ही तारीख व स्वतःचे नाव फलकावर येणे आवश्यक आहे.प्रत्येक तालुक्यातून प्राथमिक व माध्यमिक विभाग मिळून सहा क्रमांकासह एकूण ४५ विजेते घोषित केले जाणार आहेत.शक्य झाल्यास नागरिक, ग्रामस्थ, पालक-शिक्षक यांच्याबरोबर फलकासह फोटो घेऊन आपापल्या सोशल मीडियावर ीिशशरिहाशवपरसरी या हॅशटॅगसह अपलोड देखील करावेत.एका स्पर्धकास अनेक फलकलेखन करता येतील.सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी फलकलेखनाचे उत्कृष्ट फोटो देशातील पहिल्या अहमदनगर स्वीप केअर असलेल्या ९००२ १० ९००३ या व्हाट्सअप क्रमांकावर स्वतःचे संपूर्ण नाव,शाळेचे नाव,पत्ता फोन नंबरसह १० मे २०२४ पर्यंत पाठविणे आवश्यक आहे .तरी जास्तीत जास्त शिक्षक, कलाशिक्षक व कलाकारांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन असे आवाहन राहुल पाटील( उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी ), अशोक कडूस(स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी) ,मीना शिवगुंडे(स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी),आकाश दरेकर (स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी) प्रदीप पाटील (तहसीलदार-निवडणूक),बाळासाहेब बुगे (उपशिक्षणाधिकारी), डॉ.अमोल बागुल(जिल्हा मतदारदूत) , प्रशांत गोसावी (निवडणूक नायब तहसीलदार) व सर्व स्वीप समिती सदस्य आदींनी केले आहे.

# महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी आ.आजबे काका यांनी लोणी गट पिंजून काढला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या अधिकृत उमेदवार मा पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ आ.बाळासाहेब आजबे काका यांनी लोणी जिल्हा परिषद गटातील गाव भेट दौरा केला.यामध्ये खुंटेफळ वाटेफळ.लोणी,पिंपळा, सोलापूरवाडी, खुंटेफळ, पुंडी , पिंपळगाव दाणी, सराटे वडगाव, टाकळी ,रुई, फत्तेवडगाव व नांदा या गावांमध्ये जाऊन कॉर्नर बैठका व मतदारांच्या भेटी घेतल्या.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते काकासाहेब शिंदे,भाऊसाहेब लटपटे,जिल्हा उपाध्यक्ष धैर्यशील थोरवे सरपंच अशोक पोकळे, राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष भाऊसाहेब घुले, हरिभाऊ दहातोंडे, सुभाष वाळके ,अर्जुन काकडे,यावेळी जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब लटपटे ,धैर्यशील थोरवे काकासाहेब शिंदे,नगरसेवक नाजीम शेख अशोक पोकळे सुभाष वाळके , चंद्रगुप्त खलाशे, उद्धवशेठ मोडवे ,महादेव अमृते, बाबा कोहक, गणेश सासवडे, राजू वाघमोडे, अनिल गाडे, संतोष गुंड, आजिनाथ बेल्हेकर, भगवान रक्ताटे, सुभाष भोसले, एकनाथ वाळके, अक्षय सावरे, बाबासाहेब सावरे, भिकाजी वाळके, रामकिसन वाळके चांद भाई सय्यद, नितीन मिसाळ, विजय गायकवाड, जनार्दन भोर, बलभीम काळोखे,अशोक कुताळ, मारुती मुळे, कुंडलिक शेंडगे, सतीश अरुण, राजेंद्र शिंदे, विनोद शिंदे, राहुल अरुण, रामभाऊ सायबर, अशोक भिटे, रावतात्या भस्मे, ज्ञानदेव मिसाळ, बबन अनपट, शिवाजी मुकीनंद, भीमराव बोडके, सरपंच बबनराव ननवरे, कोंडीराम झांबरे, शिवदास ननवरे, बाबुराव सुंबरे, गोवर्धन संबरे, आप्पा महाराज सुंबरे श्रीरंग बापू तरटे शेख नवी गोरख शिंदे गोरख मिसाळ दादा राऊत शामराव फसले भिवाजी सासरे रामकिसन वाळके अर्जुन काकडे शिवाजी थोरवे बबन थोरवे महादेव थोरवे सुदाम खांदवे संजय थोरवे राजू खांदवे राजू मोरे श्रीधर भालेराव भास्कर थोरवे काशिनाथ थोरवे संजय काकडे संदीप जगदाळे नानाभाऊ वाडेकर दिलीप थोरवे विलास काकडे कृष्णा गलांडे पांडुरंग भालेराव दत्तू भालेराव हिंमत काकडे कांतीलाल थोरवे नवाजी काकडे ऋषिकेश काकडे बळीराम वाडेकर ज्ञानेश्वर भालेराव तुळशीराम थोरवे यांच्यासह खुंटेफळ वाटेफळ, लोणी,पिंपळा, सोलापूरवाडी, कुंटेफळ ,पुंडी, पिंपळगाव दाणी, मेहेकरी, सराटेवडगाव, रुई,नांदा व फत्तेवडगाव इत्यादी गावातील राष्ट्रवादी कॉंग्रेस व महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते ,मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे बक्षीस वितरण संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास ३ ते १४ वर्ष वयापर्यंत होत असतो. त्यामुळे याकाळातच विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी आवश्यक असणाऱ्या युपीएससी एमपीएससी परिक्षेकरीता पूर्व तयारी व मानसिकता तयार करण्यासाठी मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा दिपस्तंभ आहेत. असे प्रतिपादन अहमदनगर जिल्ह्याचे भूमिपुत्र व मणिपूर चे अप्पर जिल्हाधिकारी अभिजित पठारे यांनी केले.

मंथन वेलफेअर फाउंडेशन संचलित मंथन सामान्य ज्ञान परीक्षेतील राज्यस्तरीय गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. स्पेस ओडिसी, एफर्ट्स अकॅडमी, धनगरवाडी, अहमदनगर येथे शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास मराठी भाषा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक डॉ. कैलास दौंड, विज्ञान लेखक सुधीर फाकटकर, डीवायएसपी रँकर वैभव पडवळ, आशिष दहातोंडे, सुर नवा ध्यास नवा फेम मॉनिटर हर्षद नायबळ, मिसेस मुख्यमंत्री फेम अभिनेत्री अमृता धोंगडे, संयोजक अतुल काकडे, सचिन नरसाळे, किशोर गोरे, सुनील नरसाळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पठारे पुढे म्हणाले की, माझ्या दृष्टीने भारतातील सर्वात अवघड परीक्षा म्हणजे एम पी एस सी होय. मी सामान्य कुटुंबातून आलेलो आहे. माझे प्राथमिक शिक्षण पुण्यातील महानगर पालिकेच्या शाळेत तर माध्यमिक शिक्षण महर्षी कर्वे शिक्षण संस्थेत झाले. माझ्या मनातील कल्पना आणि माझ्या विचारांच्या आधारे बारावी नंतर मी स्पर्धा परीक्षेचा विचार सुरू केला. पदवी नंतर स्पर्धा परीक्षा देऊन यशस्वी झालो. त्यामुळे सर्व सामान्य कुटुंबातील विद्यार्थीही आपले उज्वल भवितव्य घडवू शकतात हे अनेक विद्यार्थ्यांनी सिद्ध केले आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहावे, सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आपले




शारीरिक, मानसिक व शैक्षणिक आरोग्यासाठी व्यायाम खूप महत्त्वाचा आहे, असे ते म्हणाले.

पुण्याचे सहाय्यक दुय्यम निबंधक वैभव पडवळ म्हणाले की, मंथनच्या सामान्य ज्ञान परीक्षेपासूनच मी माझी सुरुवात केली. मी कधीच मागे वळून पाहिले नाही. मंथन ने ग्रामीण भागात स्पर्धा परीक्षेचे बीज रुजविण्याचे काम केले. या परीक्षेला महाराष्ट्रात गुणवत्तेचा दर्जा आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून त्यामध्येच करिअर करावे असे ते म्हणाले. यावेळी डॉ. संदीप सांगळे, डॉ. कैलास दौंड, सुधीर फाकटकर, अभिनेत्री अमृता धोंगडे, आशिष दहातोंडे, दिनकर टेमकर यांचीही भाषणे झाली. सुर नवा ध्यास नवा फेम बाल अभिनेता हर्षद नायबळ उर्फ मॉनिटर ने माय ही कविता सादर केली. त्याच बरोबर लाईव्ह स्टेज शो मधील प्रसिद्ध सिने कलावंतांच्या सोबतचे अनुभव कथन केले. मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. रोख रक्कम, सन्मान चिन्ह, व प्रमाणपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप होते. पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांना तारांगण चा शो मोफत दाखविण्यात आला. त्याच बरोबर खगोल शास्त्रातील सोलार टेलिस्कोप, चांद्रयान, मंगळयान, अवकाशिय दुर्बीण, ऑप्टिक गॅलरी, सावलीचे घड्याळ, बर्फाचे जग दाखविण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी मंडपाच्या प्रवेश द्वारावर २ आकर्षक सेल्फी पॉइंट उभारण्यात आले होते. त्या सेल्फी पॉइंटवर व खगोल शास्त्रातील विविध मॉडेल्स सोबत विद्यार्थी व पालकांनी सेल्फी चा आनंद लुटला. निलेश भोयर यांनी प्रास्ताविक केले. अतुल काकडे यांनी मंथन वेलफेअर फाऊंडेशनच्या उपक्रमांची माहिती दिली. उमेश घेवरीकर यांनी सूत्र संचालन केले. किशोर गोरे यांनी आभार मानले.

# वनविभागातील आधिका-यांचा कारभार म्हणजे कुंपनच शेत खातंय; जिल्हाधिका-यांना तक्रार-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे





संपूर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात २.४ इतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे.वनक्षेत्र कमी असल्याने बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळाचे संकट येत आहे.वनक्षेत्र आणि हरितक्षेत्र वाढविण्यासाठी बीड जिल्ह्यातील वनविभाग ठोस पाऊल उचलण्याऐवजी वृक्षलागवडीत भ्रष्टाचार तसेच वृक्षतोडीमुळे जिल्ह्याचे वाळवंट होत असताना वनविभागातील आधिका-यांची कारवाईस टाळाटाळ आणि अनाधिकृत सा मिलकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष यामुळे बीड जिल्ह्यातील वनविभागाचा कारभार म्हणजे कुंपनच शेत खातंय अशी परिस्थिती असुन बीड जिल्ह्यातील वनविभागातील १०कोटी ८४ लाख रुपये गैरव्यवहार, अनाधिकृत वृक्षतोड आणि अनाधिकृत सा -मिल प्रकरणात कारवाईस टाळाटाळ तसेच वनविभागातील गैरव्यवहार प्रकरणात वनसंरक्षक सामाजिक वनीकरण औरंगाबाद अमितकुमार मिश्रा यांनी दोन वेळा स्मरणपत्र पाठवुन देखील चौकशी करून अहवाल देण्यास टाळाटाळ केल्याबद्दल विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) बीड, विभागीय वन (सामाजिक वनीकरण) बीड तसेच जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांच्यावर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस,शेख मुबीन,शेख मुस्ताक यांनी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ - मुंडे यांच्या मार्फत कार्यासिन अधिकारी महसूल व वनविभाग मंत्रालय, प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय नागपुर, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) छत्रपती संभाजीनगर यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. बीड जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१९-२० आणि सन २०२०-२१ वनविभागाच्या विविध कामांसाठी दिलेल्या १० कोटी ८४ लाख रुपये कामात गैरव्यवहार प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या तक्रारीनंतर वनसंरक्षक सामाजिक वनीकरण औरंगाबाद यांनी विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) बीड आणि वन अधिकारी (सामाजिक) वनीकरण बीड यांना संबंधित प्रकरणात चौकशी करून कार्यवाही करून तक्रारदारास परस्पर कळवुन कार्यालयास अहवाल सादर करावा असा आदेश देत दोन वेळा स्मरणपत्र देऊन सुद्धा अद्याप कोणतीही चौकशी व कारवाई न केल्याबद्दल संबंधित प्रकरणात जबाबदार आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी.बीड जिल्ह्यात परवानाधारक सा मिलची संख्या व कार्यरत सा मिलची संख्या यात मोठी तफावत असुन अनाधिकृत सामिल वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण व्यवहारातुन कारवाईस टाळाटाळ होत असुन संबंधित प्रकरणात जबाबदार अधिका-यांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी.बीड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी वृक्षतोडीच्या मोठ्या प्रमाणावर घटना घडत असुन वनविभागाकडे लेखी तक्रारी दिल्यानंतर सुद्धा कारवाई करण्यात येत नाही.बीड तालुक्यातील कानडीघाट गावातील अनाधिकृत वृक्षतोड प्रकरणात वनविभागातील अधिकारी यांनी स्थळपंचनामा केला मात्र संबंधित प्रकरणात गुन्हे दाखल करण्यास जाणिवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे.यापुर्वीही वृक्षतोड करणारी गाडी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी पकडल्यानंतर ती सोडण्यासाठी लाच घेताना सगळे पथकच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकल्याच्या घटना घडलेल्या आहेत.त्यामुळे संबंधित प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी.

# पंकजाताईंना मत म्हणजे बीड जिल्ह्यातील विकासकामांना मत-युवा नेते जयदत्त धस

## महायुती उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ धस-पिता पुत्रांचा मतदारसघात झंझावात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी। राजू म्हस्के



बीड लोकसभा निवडणुकीच्या भाजपा,शिवसेना आणि मित्र पक्षांच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे ह्या महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास मंत्री असताना जातीपाती अथवा गाव न पाहता त्यांनी मतदारसंघातील प्रत्येक गावांना भरघोस निधी उपलब्ध करून विकास कामे केले आहेत.त्यामुळे आपले अमूल्य मत वाया न घालता पंकजाताई यांना मत म्हणजे विकासाला मतदान असे प्रतिपादन युवा नेते जयदत्त धस यांनी केले. ते बीड लोकसभा मतदार संघाच्या भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्ष महायुतीच्या उमेदवार भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव माजी ग्रामीण विकास मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ सोमवार दि.२९ एप्रिल रोजी बेलगाव येथे गाव भेट दौऱ्या दरम्यान ग्रामस्थांना ग्रामस्थांशी संवाद साधताना केले.

आ.सुरेश धस यांच्यासह धस पिता-पुत्रांसह कुटुंबाचा मतदारसंघात झंझावात सुरू असुन प्रत्येक गावागावात जाऊन महायुतीचे उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ सभा घेऊन प्रचारात आघाडी घेताना दिसत आहेत. यावेळी पुढे बोलताना जयदत्त धस म्हणाले,मागील काळात खा.प्रीतम ताई मुंडे यांच्या वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला रेल्वे प्रश्न असो,सुरत चेन्नई हा एक्सप्रेस हायवे असो त्यातून नक्कीच दळणवळणाची संधी मिळणार असून केंद्राच्या विकासात्मक धोरणामुळे आपल्या तालुक्यातुन ९ एक्सप्रेस हायवे जात आहेत.केंद्र सरकारने देखील जलजीवन ही योजना देखील प्रभावी राबविली आहे.शेतकऱ्यांना पेन्शन योजनेचा लाभ मिळाला असल्याचे धस म्हणाले पुढे म्हणाले, मोफत रेशन देण्याचा काम केले आहे.घरकुल, विहीर, शेततळे, पाणंद रस्ते, बेलगाव ग्रामस्थांचे आराध्य दैवत रेणुकाई देवी मंदिर परिसरातील विकास कामांना ५ कोटी मंजूर केले आहेत. आरक्षणाबाबत देखील हे सरकार सकारात्मक आहे. विधिमंडळात देखील आ.सुरेश धस यांनी वेळोवेळी देखील आवाज उठवला असून सरकारने देखील १०ङ्ग टिकणारे आरक्षण दिले आहे. लोकसभा निवडणूक ही देशाचे भवितव्य ठरवणारी ही निवडणूक आहे.येणाऱ्या १३ मे ला भाजपाला मतदान करून पवित्र काम करावे आणि पंकजाताई यांना मत म्हणजे विकासाला मत असल्याचे शेवटी युवा नेते जयदत्त धस यांनी केले.यावेळी बोलताना माजी सरपंच बन्सी पोकळे म्हणाले की,लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे ह्या ग्रामविकास मंत्री होत्या त्या काळात विकास आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून आष्टी मतदारसंघात अनेक विकास कामे झाली असून हे विकासाभिमुख नेतृत्व असून येत्या १३ मे रोजी पंकजाताई यांना भरघोस मतांनी विजयी करावे अशी विनंती केली.यावेळी कार्यक्रमाचे आभार सेवानिवृत्त कृषी संचालक प्रल्हाद पोकळे केले.

यावेळी माजी सरपंच बन्सी भाऊ पोकळे,गण प्रमुख रावसाहेब मुटकुळे,उधोजक प्रविण वारे, सेवानिवृत्त कृषी संचालक प्रल्हाद पोकळे,सरपंच तात्यासाहेब शिंदे, उपसरपंच सतीश पोकळे,माजी सरपंच संजय पोकळे,माजी उपसरपंच संजय पोकळे,माजी सरपंच राम पोकळे,माजी ग्रा.प. सदस्य अमृत पोकळे,चेअरमन मनोज पोकळे, भाऊसाहेब पोकळे, ज्ञानेश्वर पोकळे,माजी सरपंच मधुकर पोकळे,माजी ग्रा.प.सदस्य अनिल पोकळे,मारुती सरोदे, महादेव पोकळे,शिवाजी पोकळे, शरद पोकळे यांच्यासह बेलगाव ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.


## मतदार यादीत घोळ नव्हे तर नुसता बट्ट्याबोळ !

# जिवंत व्यक्ती असतानाही दाखवले मतदार यादीत नाव बाद । शिंदी येथील ११ मतदार मतदानापासून वंचित

## तर सिंदखेडराजा तालुक्यातील २०० मतदार मतदानापासून वंचित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत




एका बाजूला प्रशासन मतदानाचा टक्का वाढावा म्हणून विविध प्रकारच्या उपाययोजना करत आहे. लोकांना मतदान करण्याकरिता परावृत्त करत आहेत आणि मतदान प्रत्येकाने केले पाहिजे तो आपला अधिकार आहे असेही सांगत आहे ,तर दुसरीकडे सिनखेड राजा मतदारसंघांमध्ये मतदार यादी मध्ये बट्ट्याबोळ बघायला मिळाला आहे ,

२६ एप्रिल रोजी बुलढाणा जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकी करता मतदान घेण्यात आले. सिंदखेड राजा तालुक्यातील शिंदी येथे एका वयोवृद्ध आजी जिने अनेक उन्हाळी पावसाळे अनुभवले अनेक प्रधानमंत्री पदाकरिता मतदान केले नेमके त्याच आजीचे नाव मतदान यादी मध्ये उपलब्ध होते मात्र त्यांच्या फोटोवर डिलीटेड चा शिक्का मारण्यात आला असल्यामुळे आजी मतदानापासून वंचित राहिल्या. त्या मतदान बुथ पासून परत माघारी घरी परतल्या, एवढेच नाही तर एक तरुणी २२ वर्षीप सुद्धा मोठ्या उत्साहामध्ये मतदान करण्याकरता बुथ वर आली मात्र त्या मुलीच्या मतदान नावापुढेच डिलीटेड चा शिक्का असल्यामुळे ती सुद्धा मतदानापासून वंचित राहिले,अशाप्रकारे ११ मतदाराच्या नावापुढे हा घोळ दिसला व ते मतदानापासून वंचित राहिले,तर सिंदखेडराजा तालुक्यामध्ये जवळपास २०० मतदार हे जिवंत असून सुद्धा केवळ डिलीटेड शिक्का मारल्यामुळे मतदानापासून वंचित राहिले,

याबाबत उपविभागीय अधिकारी तथासायक निवडणूक निर्णय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे यांच्याशी दूरध्वनी वरून संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की यावर आता कुठल्याही प्रकारचा उपाययोजना केल्या जाणार नाही त्यांना मतदान करता येणार नाही याद्या दुरुस्त करून यावर निर्णय घेतल्या जाईल, मात्र ही उपाययोजना केली असती तर नक्कीच त्यांना मतदान केल्या गेले असते.मतदान यादीमध्ये जी व्यक्ती मतदान करणे करता आली त्या व्यक्तीचा नंबर त्या व्यक्तीचा फोटो सर्व व्यवस्थित होते फक्त डिलीटेड चा शिक्का होता मतदान केंद्रामध्ये अनेक उमेदवारांचे प्रतिनिधी उपलब्ध होते त्यांना जर मतदान करू द्यायची की नाही असे विचारणा जरी केली असती ते गावातील असल्यामुळे व ओळखीचे असल्यामुळे नक्कीच मतदार मतदानापासून वंचित राहिला नसता एवढं मात्र खरे,मात्र मतदानापासून वंचित राहिल्यामुळे मतदारांमध्ये नाराजीचा सूर उमटत होता.

# महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण, पिता-पुत्राविरुद्ध गुन्हा दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सांगोला । प्रतिनिधी

आमच्या घरगुती विज कनेक्शन कोटेशनची पावती आत्ताच्या आत्ता द्या असे म्हणून चिडून पिता-पुत्राने मिळून शिवीगाळ, दमदाटी करीत विद्युत सहाय्यकाच्या श्रीमुखात लागावली. तर त्यांचे सहकारी कंत्राटी कर्मचारी यालाही लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ, दमदाटी केली.ही घटना शुक्रवार २६ रोजी दुपारी ४ च्या सुमारास नाझरा ता सांगोला येथील विद्यामंदिर समोरील पेट्रोल पंपावर घडली. याबाबत, सोमनाथ कचरू ससाणे रा. नाझरे ता. सांगोला यांनी फिर्याद दिली असून, पोलिसांनी सलीम मोहम्मद काझी व मोबीन सलीम काझी पिता-पुत्राविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला.

याबाबत , नाझरे येथील सलीम काझी यांनी त्यांच्या घरासाठी घरगुती विज मागणीसाठी अर्ज केला होता. त्यानंतर त्यांनी महावितरणचे कोटेशनची फी मार्च २०२३ मध्ये भरली. परंतु त्याबाबत पावती घेतली की नाही हे फिर्यादीला माहिती नव्हते. दरम्यान शुक्रवारी सकाळी ८:३० च्या सुमारास फिर्यादी विद्युत सहाय्यक सोमनाथ ससाने यांनी महावितरणच्या नाझरे येथील कार्यालयात येवून तहसीलदार सांगोला यांच्या आदेशानुसार माण नदीकाठी असलेले ट्रान्सफॉर्मर बंद करण्यासाठी गेले तेथील काम संपवून दुपारी ४ च्या सुमारास सरगरवाडी डोंगरेमळा येथे घरगुती कनेक्शन बिघडल्याने ते दोघेजण दुचाकीवरून जाताना वाटेत पेट्रोल भरण्यासाठी दुचाकी घेवून पंपावर गेले असता सलीम काझी व त्यांचा मुलगा मोबीन काझी यांनी त्या ठिकाणी येऊन आमच्या कोटेशनची पावती आत्ताच्या आत्ता दे असे म्हणाले.

# उष्माघातात नागरिकांनी स्वत:चा बचाव करावा उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम रजा

उष्णतेच्या लाटेमुळे शारीरिक ताण पडून मृत्यू होण्याची शक्यता आहे. उष्णतेच्या लाटेमुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी उष्माघातात नागरिकांनी स्वत:चा बचाव करण्यासाठी खालील उपाययोजना कराव्यात, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी केले आहे.

काय करावे :

उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडीओ, टि.व्ही. किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा.

तहान लागलेली नसली तरीसुध्दा जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे.

हलकी, पातळ व सूती कपडे वापरावेत. बाहेर जातांना गॉगल्स, छत्री, हॅट, बुट व चपलाचा वापर करण्यात यावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत घ्यावी.

जर आपण बाहेर उन्हात काम करीत असाल तर हॅट किंवा छत्रीचा वापर करण्यात यावा. तसेच ओल्या कपडयांनी डोके, मान, चेहरा झाकण्यात यावा.

शरीरात पाण्याचे प्रमाण कमी होत असल्याने ओ.आर.एस., घरी बनविण्यात आलेली लस्सी, तोरणी, लिंबू-पाणी, ताक इत्यादींचा वापर नियमित करण्यात यावा.

अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा.

गुरांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेसे पाणी पिण्यास देण्यात यावे.

घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा.

पंखे, ओले कपडे यांचा वापर करण्यात यावा. तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे.

कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.

सूर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळणसाठी कामगारांना सुचित करण्यात यावे.

पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा.

गरोदर महिला कामगार व आजारी कामगारांची अधिकची काळजी घेण्यात यावी.

काय करू नये :

लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये.

दुपारी १२.०० ते ४.०० या कालावधीत बाहेर उन्हात जाण्याचे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे.

बाहेर तापमान जास्त असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावीत. तसेच दुपारी १२.०० ते ४.०० या कालावधीत बाहेर काम करण्याचे टाळावे.

उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. (तसेच मोकळया हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावीत.)

शरीरात पाण्याचे प्रमाण कमी करण्यास कारणीभूत असलेले चहा, कॉफी, मद्य व कार्बोनेटेड थंड पेय इत्यादींचा वापर टाळावा.

शिळे अन्न खाऊ नये आणि उच्च प्रथिने (झ्रींशळपी) असलेले अन्न टाळावे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904